| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | ०३.११.२०१० |
| नोंदणी दिनांक | - | ०३.११.२०१० |
| निकाल दिनांक | - | ०७.१०.२०१४ |
| कालावधी | - | व म दि<br>३ ११ ४ |

सांगली येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्रीमती एच.ए.पाटील )

समरी क्रिमिनल केस नं. १३५७/२०१०

(समन्स केस म्हणून चालविली)

निशाणी नंबर -४५

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट सरकार<br>तर्फे पोलीस निरिक्षक, विश्रामबाग<br>पोलीस स्टेशन, सांगली | ) | फिर्यादी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| सचिन गोविंदराव पाटील,<br>वय ३२ वर्षे, धंदा ट्रान्स्पोर्ट,<br>रा.विद्यानगर गल्ली नं.३,<br>विश्रामबाग, सांगली | ) | आरोपी |

भारतीय दंड विधान संहिता कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६अन्वये गुन्हा

सरकार पक्षातर्फे सहाय्यक पोलीस अभियोक्ता सौ ममता पाटील
आरोपीतर्फे श्री.ए.व्ही.रजपूत वकील.

**न्यायनिर्णय**

(दि. ०७.१०.२०१४ रोजी घोषीत)

१. आरोपीं विरूध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे.

२. सरकारपक्षाच्या केसची थोडक्यात हकिकत अशी की,

दिनांक ७.७.२०१० रोजी रात्री ००.३० वाजता नागराज मंदीर जवळ रोडवर, वारणाली, विश्रामबाग, सांगली येथे फिर्यादी व साक्षीदार शशिकांत अशोक जाध हे सरकारी गणवेशात रात्री नाईट राउंड डयुटी बजावीत असताना आरोपी हे दारू प्यालेले परिस्थितीत मिळून आलेने त्याला रात्र झाली आहे, घरी जावून झोपा जावा असे समजावून सांगत असताना आरोपीनी फिर्यादी व साक्षीदार यांना तुम्ही कोण सांगणार ? रांडेच्या म्हणून शिवीगाळ करून, तुम्हाला बघून घेतो म्हणून दमदाटी करून, सरकारी गणवेशात असताना, फिर्यादी याचे शर्टाचे कॉलरला धरून, धक्काबुक्की करून, दोघांना ढकला ढकली करून पाडले, सरकारी डयुटी बजवीत असताना अडथळा केला म्हणून त्याने आरोपी विरूध्द फिर्याद दाखल केली.

३. सदरची वर्दी दाखल झाल्या नंतर विश्रामगबाग पोलीस स्टेशन मध्ये गू.र.नं.१५६/२०१० दाखल झाला. त्या नंतर तपासी अंमलदार श्री एल.एस.जाधव, ए.एस.आय. विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली यांनी घटनास्थळी जावून पंचा समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासामध्ये आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचे विरूध्द वर नमूद कलमान्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपी विरूध्द नि.११ अन्वये दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा नाकबूल करून संपरिक्षा करण्याची मागणी केली. आरोपीचा बचाव नकाराचा आहे. सरकारी पक्षाच्या तोंडी पुराव्यात आरोपींना गुन्हयात गोवणारा सकृतदर्शनी पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचा जबाब नोंदविणेत आला नाही.

५. प्रस्तुत खटल्यात दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे या न्यायालयाच्या निष्कर्षासाठी उपस्थित होत असून त्याचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह

नोंदविले आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सरकारपक्ष हे सिध्द करतो का की दिनांक ७.७.२०१० रोजी रात्री ००.३० वाजता नागराज मंदीर जवळ रोडवर, वारणाली, विश्रामबाग, सांगली येथे फिर्यादी व साक्षीदार शशिकांत अशोक जाधव हे सरकारी गणवेशात रात्री नाईट राउंड डयुटी बजावीत असताना त्यांचे सरकारी कामात अडथळा निर्माण केला ? | | नाही. |
| २. | सरकारपक्ष हे शाबित करतो का की आरोपी याने वरील नमुद वेळी,ठिकाणी फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले ? | | नाही. |
| ३. | सरकारपक्ष हे शाबित करतो का की आरोपी याने वरील नमुद वेळी,ठिकाणी फिर्यादी व साक्षीदारास बघून घेतो अशी दमदाटी केली ? | | नाही. |
| ४. | आदेश काय ? | | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

### मुद्दा नंबर १ ते ३ च्या संदर्भात:

**६.** सदर तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडित असल्याने व त्या बाबत एकच पुरावा असल्याने केवळ वाक्यांची पुनरावृत्ती टाळणेसाठी मी त्यांची एकत्र चर्चा करीत आहे.

आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकापक्षाने फक्त एकच साक्षीदार तपासला. साक्षीदार क्र.१ घटनास्थळाचा पंच सुनिल वासूदेव सावंत यास नि.३९ कडे तपासले आहे. त्या नंतर सरकारपक्षास वारंवार संधी देवून देखील सरकारपक्षाने या कामी फिर्यादी अथवा इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार या कामी तपासलेले नाहीत. म्हणून दिनांक ३.९.२०१४ रोजी नि.१ कडे हुकूम करून सरकारीपक्षास साक्षीदार तपासणेसाठी अंतिम

संधी दिली होती. तरी देखील त्यांनी या कामी कोणाही इतर साक्षीदारास या कामी तपासलेले नाहीत. त्या नंतर दिनांक २९.०९.२०१४ रोजी नि.१ कडे हुकूम करून सरकारपक्षाचा पुरावा बंद करणेत आला.

७. सरकारपक्षाची अशी केस आहे की, दिनांक ७.७.२०१० रोजी रात्री ००.३० वाजता नागरार मंदीर जवळ रोडवर, वारणाली, विश्रामबाग, सांगली येथे फिर्यादी व साक्षीदार शशिकांत अशोक जाध हे सरकारी गणवेशात रात्री नाईट राउंड डयुटी बजावीत असताना आरोपी हे दारू प्यालेले परिस्थितीत मिळून आलेने त्याला रात्र झाली आहे, घरी जावून झोपा जावा असे समजावून सांगत असताना आरोपीनी फिर्यादी व साक्षीदार यांना तुम्ही कोण सांगणार ? रांडेच्या म्हणून शिवीगाळ करून, तुम्हाला बघून घेतो म्हणून दमदाटी करून, सरकारी गणवेशात असताना, फिर्यादी याचे शर्टाचे कॉलरला धरून, धक्काबुक्की करून, दोघांना ढकला ढकली करून पाडले, सरकारी डयुटी बजवीत असताना अडथळा केला. पण आरोपीचा बचाव नकाराचा आहे. या पाश्वभूमीवर आपल्याला सरकारपक्षाच्या पुराव्याचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे.

८. सदर कामी आरोपी विरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारपक्षाने या कामी फक्त घटनास्थळाचा पंच हा एकच साक्षीदार तपासला आहे. त्याने आपले सरतपासात असे नमुद केले आहे की, त्याला पोलीसानी घटनास्थळाचा पंचनामा करणेसाठी पोलीस स्टेशनला बोलावले होते. पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये केला. व त्याने त्यावरील त्याची सही फक्त मान्य केली आहे. पंच हा सरकारपक्षास साथ देत नसल्याने सरकारी वकीलांनी त्यांना फितूर जाहीर करून त्यांचा उलटतपास घेतला. सरकारपक्षाने उलटतपासात सरकारपक्षास मदत होईल अशी कोणतीही मान्यता त्याने आपले उलटतपासात दिलेली नाही. त्यामुळे त्याचा पुरावा सरकारपक्षास आरोपी विरूध्दचा गुन्हा शाबित करणेस उपयोगी पडणारा नाही.

९. या कामी सरकारपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या कामी सरकारपक्षाने फक्त पंच साक्षीदारास तपासलेले आहे. सरकारपक्षास वारंवार संधी देवून देखील सरकारपक्षाने या कामी फिर्यादी अथवा इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार या कामी तपासलेले नाहीत. सदर काम सन २०१० पासून प्रलंबित आहे. सदर कामी दिनांक २.४.२०१३ रोजी नि.११ वर आरोपी विरूध्द दोष निश्चिती करणेत आली आहे. त्या नंतर वारंवार समन्स व जामीनपात्र वॉरंट काढून देखील पोलीस साक्षीदार कोर्टात हजर राहिले नाहीत. या वरून असे दिसून येते की, निव्वळ आरोपीला त्रास देण्यासाठी व खटला लांबणीवर टाकणेसाठी पोलीस साक्षीदार कोर्टात येत नाहीत. म्हणून मी दिनांक ३.९.२०१४ रोजी नि.१ कडे हुकूम करून सरकारीपक्षास साक्षीदार तपासणेसाठी अंतिम संधी दिली होती. तरी देखील त्यांनी या कामी कोणाही इतर साक्षीदारास या कामी तपासलेले नाहीत. त्या नंतर दिनांक २९.०९.२०१४ रोजी नि.१ कडे हुकूम करून सरकारपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. या कामी सरकारपक्षाने फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अथवा तपासी अंमलदार यांना या कामी तपासले नसल्याने आरोपीवरील गुन्हा सिध्द झालेला नाही व फक्त घटनास्थळाच्या पंचनाम्याच्या पंचाच्या साक्षीवर आरोपीस दोषी धरता येणार नाही. या सर्व कारणास्तव सरकारपक्ष हा आरोपीं विरूध्द गुन्हा शाबित करणेतस अयशस्वी ठरला आहे. म्हणून मी मुददा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुददा क्र.४ करिता</u>**

१०. मुददा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष विचारात घेता मुददा क्र.४ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी सचिन गोविंदराव पाटील यांची भारतीय दंड विधान संहिता कलम ३५३, ५०४, ५०६ अन्वये असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५

(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आले.)

सांगली (श्रीमती एच.ए.पाटील)

दिनांक : ०७.१०.२०१४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सांगली.